# जनसंपर्क अधिकारी

**मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्स

**प्रेसनोट २६३-२२** **दिनांक २७/०८/२०२२**

## जमिनीत गाडलेले पुरातन सोन्यांची नाणे स्वस्त दरात विक्री करण्याचा बहाणा करुन फसवणुक करणा-या ४ आरोपीतांना अटक - गुन्हे शाखा, कक्ष-३ विरार यांची कामगिरी.

**-------ooooo-------**

दिनांक २५/०७/२०२२ रोजी सायंकाळी ४.०० वाजताचे सुमारास एका अनोळखी व्यक्तीने पंचवटी हॉटेल जवळील भाजी मार्केट वसई (पश्चिम) येथे त्याचे जवळ ५ किलो सोन्याचे पाने असल्याबाबत फिर्यादी सुनिल प्रविणचंद्र चोक्सी यांचा विश्वास संपादन करुन त्यांचेकडील १२,००,०००/- रुपये रोख रक्कम त्यांना देण्यास भाग पाडुन फिर्यादी यांना सोन्याचे पाने न देता पितळी धातुचे पाने देवुन त्यांची फसवणूक करून पळुन गेला होता. सदरबाबत फिर्यादी यांनी अज्ञात आरोपीताविरुध्द दिलेल्या फिर्यादीवरुन वालीव पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर ७६८/२०२२ भा.दं.वि. कलम ४२० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात जमीनीत गाडलेले पुरातन सोन्याचे नाणे मिळालेले आहे असे भासवुन ते कमी किंमतीत विक्री करण्याचा बहाणा करुन नागरिकांची फसवणुक करण्या-या गुन्हयांमध्ये दिवसेंदिवस वाढ झाली होती. सदर गुन्हयांची वरिष्ठांनी गांभीर्याने दखल घेवुन गुन्हयांना आळा घालणेकामी व आरोपीतांचा शोध घेण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष ३ विरार मधील कार्यरत अधिकारी व अंमलदारांची वेगवेगळी स्वतंत्र पथके तयार करुन गुन्हयातील आरोपीतांचा तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने माहिती प्राप्त करुन शोध घेतला व आरोपीत नामे १) विशाल धर्मा राय, वय १९ वर्षे, रा. गुप्ता मेडीकल समोर जैन नगर, खेडा फिरोजाबाद, राज्य उत्तर प्रदेश., २) संजु वालीया राय, वय २७ वर्षे, रा. घर नंबर ३५४, सुशीला विहार २ , बुलंद शहर, राज्य उत्तर प्रदेश, ३) शिवराम हिरालाल माली, वय ५७ वर्षे, रा. गुप्ता मेडीकल जवळ, जैन नगर, खेडा फिरोजाबाद, राज्य उत्तर प्रदेश, ४) मिना रामलाल सोलंकी, वय ४५ वर्षे, रा. गुप्ता मेडीकल जवळ, जैन नगर, खेडा फिरोजाबाद, राज्य उत्तर प्रदेश यांना अंदाजे ५ किलो वजनाच्या पिवळया रंगाचे बनावट सोन्याचे पाने, मनी व मन्यांची माळ अशा मुददेमालासह ताब्यात घेतले. सदर गुन्हयाचा पुढील तपास वालीव पोलीस ठाणे करीत आहे.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), अति.कार्यभार (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.प्रमोद बडाख, पो.उप.निरी. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारवकर, पो.ना. मनोज सकपाळ, पो.अं.राकेश पवार, अश्विन पाटील, सुमित जाधव सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष ३ विरार यांनी पार पाडली आहे.

**----oooo----**


Levi's